# देवाच्या मृत्यूदूताने दुष्ट राजाला त्याच्या गुलामांची सुटका करण्यास भाग पाडले

**प्रार्थना.** ''प्रिय प्रभू, लोकांची पाप, मरण व अशुद्ध आत्म्यांच्या गुलामगिरीतून सुटका व्हावी यासाठी तुझ्यावर भरवंसा ठेवण्यास साहाय्य कर.



**The Death Angel**

मोठ्या मुलाने किंवा एखाद्या प्रौढ व्यक्तीने गुलामगिरीतून इस्राएलची सुटका हा वृत्तांत सांगावा यासाठी पुढे तीन भागांमध्ये निवेदकाने सांगावयाच्या सारांशातील नऊ मुद्यांचा उपयोग करा.

नाट्यीकरण करा इस्राएलची गुलामगिरीतून सुटका (निर्गम अध्याय 11-15):

- मुलांना नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढाऱ्यांशी चर्चा करून व्यवस्था करा.
- मुलांकडून शिकविण्याच्या वेळी नाटिकेच्या तालमी करून घ्या.
- मोठ्या मुलांनी लहान मुलांकडून तयारी करून घेण्यासाठी मदत करावी.
- तुम्ही सर्व भूमिका केल्याच पाहिजेत असे नाही.
- मोठ्या मुलांनी वा प्रौढांनी फारो, घाबरलेले मूल, निवेदक व मोशे ह्या भूमिका कराव्यात.
- लहान मुलांना विविध अभिनय करणाऱ्या नाटकांच्या भूमिका द्या.

### भाग एक

**निवेदक** वृत्तांताच्या पहिल्या भागाचा थोडक्यात सारांश करा:

1) मिसरचे क्रूर लोक देवाच्या लोकांना फटके मारीत आणि त्यांना गुलाम म्हणून काम करायला भाग पाडत.

2) देवाने त्यांचा आक्रोश ऐकला आणि त्यांना गुलामगिरीतून सोड असे दुष्ट फारो राजाला सांगण्यास मोशेला पाठविले.

3) फारोने नकार दिला, मग त्याने गुलामांना मुक्त करावे यासाठी त्याच्यावर दबाव आणण्याकरिता देवाने पिडा पाठविल्या.

मग म्हणा, ''मोशे दुष्ट फारो राजाकडे कशाची मागणी करतो ते ऐका.''

**मोशे:** ''इस्राएलाचा सर्वसमर्थ परमेश्वर देव तुला आज्ञा करीत आहे, त्याच्या लोकांना गुलामगिरीतून मुक्त कर,''

**फारो:** ''तुझा देव असा कोण आहे की मी त्याची आज्ञा पाळावी? मिसरचे अनेक देव त्यापेक्षा अधिक सामर्थ्यशाली आहेत!''

**मोशे:** ''आमचा देव तुझ्या दैवतांपेक्षा अधिक सामर्थ्यशाली आहे हे सिद्ध करण्यासाठी तो पीडा पाठवील,''

**निवेदक:** ''पहिली पीडा! प्राचीन मिसरचे लोक नाईल नदीला देव मानीत असत म्हणून देवाने त्यातील पाण्याचे रक्त केले.''

**फारो:** आमचे सगळे झरे खराब झाले, पण माझे लोक स्वच्छ पाणी मिळावे यासाठी विहीरी खोदत आहेत,''

**अभिनय करणार:** बेडकांसारख्या उड्या मारा.

**निवेदक:** दुसरी पीडा! बेडूक! फारो व त्याचे लोक बेडकांसंबंधी काय बोलतात ते ऐकलेत!''

**फारो:** ''सगळीकडे बेडूकच बेडूक! माझ्या झोपायच्या खोलीतही बेडूक आहेत! हाकलून लावा त्यांना!''

**अभिनय करणारे:** तुमच्या हातांवर, मानेवर गालावर चापट्या मारा उवा झाल्याची तक्रार करा.

**निवेदक:** ''तिसरी पीडा! उवा! लोक उवांबद्दल काय म्हणतात ते ऐका.''

**फारो व अभिनय करणारे:** तुमच्या आजूबाजूला असणाऱ्या माशा हाताने हाकला आणि त्याबद्दल तक्रार करा.

**निवेदक:** ''चौथी पीडा! गोमाशा! बघा फारो आणि त्याचे लोक गोमाश्यांचे काय करीत आहेत.''

**अभिनय करणारे:** हात व गुडघ्यांवर ओणवे होऊन गाईसारखा आवाज करा. मग पाय हवेत उडवून लोळा.

**निवेदक:** ''पाचवी पीडा! गुरे मरण्याचा भयंकर रोग! बघा गायी कशा तडफडत आहेत.''

**फारो व अभिनय करणारे:** काहीजणांनी आपले हात तर काहींनी तोंड धरावे आणि वेदना होत असल्यासारखे ओरडावे.

**निवेदक:** ''सहावी पीडा! गळवांची पीडा! पाहा फारो आणि त्याचे लोक गळवांच्या पीडेने कसे सैरभैर झाले आहेत.''

**अभिनय करणारे:** वर बघा आणि तुमचा चेहरा वरून पडणाऱ्या गारांपासून वाचवीत असल्याचा अभिनय करा आणि मग खाली पडा.

**निवेदक:** ''सातवी पीडा! गारांचा वर्षाव! गारांचा वर्षाव झाल्यावर हे मूर्तिपूजक लोक काय करतात ते बघितले!

**अभिनय करणारे:** टोळांसारख्या आजूबाजूला उड्या मारा.

**फारो:** ''अरे त्यांना हाकला! मोशे! ते आमचे सर्व पिक खाऊन टाकतील!''

**निवेदक:** ''आठवी पीडा! टोळधाड! बघा टोळांनी काय केले ते.''

**अभिनय करणारे:** आंधळ्यासारखे चाला. मिट्ट काळोख आहे काही दिसत नाही अशी तक्रार करा. हाताने चाचपडत चाला. एकमेकांवर आदळून खाली पडा.

**निवेदक:** नववी पीडा! मिसरचे लोक सूर्याची उपासना करीत म्हणून देवाने अंधार पाठविला! बघा लोक काय करीत आहेत.''

## भाग दोन

**निवेदक:** वृत्तांताच्या दुसऱ्या भागाचा थोडक्यात सारांश करा:

1) शेवटची पीडा आली तेव्हा मृत्यूचा दूत सर्व देशभर फिरला आणि त्याने प्रत्येक घरातील मोठे मूल मारले.
2) विश्वासणाऱ्यांनी आपल्या दारांवर कोकऱ्याचे रक्त लाविले होते.
   देवदूत रक्त पाहून ते घर ओलांडून पुढे गेला.
3) त्यांनी घाईघाईने ते कोकरू खाल्ले. यहूदी लोक प्रत्येक वर्षी याच दिवशी वल्हांडणाचा सण साजरा करतात.

**घाबरलेले मूल:** पुढील कविता सावकाश, अर्थ समजून वाचा किंवा म्हणा, मुलाची भयप्रद आशा.

मूल दु:खाने रडते मला झोप येत नाही
माझ्या छातीत भीतीने धडधडते!
मोशेने सांगितले आज रात्रीच हे घडणार,
मृत्यूचा दूत मिसर देशात फिरणार आहे,
आणि आमच्या दारावर कोकऱ्याचे रक्त नसेल
तर मी थोरला मुलगा, मरण पावणार.
रात्र काळोखी आहे आणि आता तर काळोख अधिकच दाटला आहे.
हवा गार आणि गारठा वाढतच आहे.
कोणत्याही घरातून एकही शब्द ऐकायला येत नाही.
कदाचित तो देवदूत येणारच नसेल!
हे काय! अगदी दूरवरून यातनांचा कल्लोळ मला ऐकू येत आहे. देवाचा मृत्यू दूत येत आहे.
पुन्हा मला मृत्यूची चाहूल येथे जवळच लागली आहे.
सगळी कडून मिसरच्या भाषेत रडारड ऐकू येत आहे. (थांबा)
रात्र बरीच उलटल्यावर, मला फक्त हुंदके ऐकू येतात आरडाओरडा शांत झाला आहे.
अरे, बघा मी जिवंत आहे! कोकऱ्याच्या रक्ताने मला जीवन दिले.''

## भाग तीन

**निवेदक:** वृत्तांताच्या तिसऱ्या भागाचा थोडक्यात सारांश करा:

1) फारोने लोकांना जाण्याची परवानगी दिली, पण त्याचे मन बदलले आणि त्याने आपले सैन्य त्यांच्यामागे पाठविले.

2) देवाने आपल्या लोकांना पलीकडे जाता यावे यासाठी तांबड्या समुद्रातून रस्ता खुला केला.

3) सैनिकांनी त्यांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला तेव्हा पाणी पूर्ववत झाले आणि सैन्य बुडाले.

मग म्हणा, ''मिसरच्या लोकांच्या घरांतील ज्येष्ठ पुत्राचे मरण ही दहावी पीडा आल्यानंतर फारो काय म्हणतो ते ऐका!''


**फारो:** ''माझा ज्येष्ठ मुलगा मरण पावला म्हणून मी त्या गुलामांना जाऊ दिले. पण आता मी माझे मन बदलले आहे! सैनिकहो, तुमचे घोडे रथ सज्ज करून त्यांच्या मागे जा! प्रत्येक इस्राएली माणसाला मारून टाका!''

**अभिनय करणारे:** पळा आणि धावणाऱ्या घोड्यांसारखा अभिनय करा. मग पाणी अंगावर येत आहे असे समजून आरडाओरडा करा. खाली पडा.

**मोशे:** ''जो पवित्र आहे त्याची स्तुती करा! त्याने आपल्या अद्भुत सामर्थ्याने आमची गुलामगिरी आणि मृत्यूपासून सुटका केली! आमेन!''

**निवेदक:** नाटिकेसाठी मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना।.

मुलांना बेडकाचे चित्र काढायला सांगा. हे चित्र त्यांनी उपासनेच्या वेळी मोठ्या माणसांना दाखवून देवाने, दुष्ट राजाने गुलामांना सोडावे म्हणून बेडकांची पीडा पाठविली हे स्पष्ट करा.



**कविता.** चार मुलांना निर्गम 15:3-6 यातील एकेक वचन म्हणायला सांगा देवाने ख्रिस्ताच्या जन्मापूर्वी 1500 वर्षे अगोदर आपल्या लोकांना कसे वाचविले याविषयी मोठ्या मुलांना कविता लिहिण्यान सांगा.

**पाठ करा** स्तोत्र 91:1

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू, तू सर्वसमर्थ आहेस. तू आमची सैतान ह्या दुष्ट राजापासून सुटका केलीस. कृपा करून आमच्या मित्रांनाही यातून सोडव, येशूच्या सर्वसमर्थ नावात मागतो, आमेन.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net